ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके भागविण्यासाठी जिल्हा परिषदांना ५० % इतके अनुदान देण्याबाबतची योजना.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००५/सीआर-१०८०/पापु-०७.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दि. ७ सप्टेंबर, १९९६.

पहा :- [१] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम-२०८५/सीआर-१९४०/२२, दि. ०९.०८.१९८५.

[२] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम-२०८५/सीआर-१९४०/२२, दि. २९.०७.१९८६.

[३] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम-२०८५/सीआर-१९४०/२२, दि. ३०.०१.१९९०.

प्रस्तावना :-

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम आणखी परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कोणते धोरण असावे या संदर्भात शासनाने जुलै, १९९५ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर श्वेतपत्रिका काढली होती. या संदर्भात शासनाच्या असे निदर्शनास आले की, पिण्याच्या पाणी पुरवठा योजना परिणामकारकरित्या राबविण्या संदर्भात योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. योजनांच्या देखभाल व दुरुस्तीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी अभावी पुरेसे लक्ष देता येत नाही. ही बाब लक्षात घेवून, योजनांच्या देखभाल व दुरुस्ती संदर्भात स्वतंत्र गावाच्या पाणी पुरवठा योजना चालविण्यासाठी येणाऱ्या वीज बिलाच्या खर्चावर ५०% अनुदान ग्राम पंचायतींना देण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन दि. ९.८.१९८५ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. तथापि, ही सवलत प्रादेशिक योजनांच्या बाबतीत जिल्हा परिषदांना देण्यात आलेली नव्हती. योजना चालविण्यासाठी वीज देयकांवर येणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत वीज देयकांवर ५० टक्के अनुदान देण्याची जी सवलत ग्राम पंचायतींना देण्यात आली आहे, तीच सवलत ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे बाबतीतही जिल्हा परिषदांना देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे:-

...२/-

२६

शासन निर्णय :

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांवरील जी वीज देयके जिल्हा परिषदांना येतात, त्या वीज देयकांच्या ५०% रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते. सदर योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० [१][बी] अन्वये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे. त्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल :-

[अ] ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची वीज देयके ही प्रथम जिल्हा परिषदांनी त्यांचे जिल्हा निधीतून किंवा जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून नेहमीच्या पध्दतीप्रमाणे अदा करावीत.

[ब] वरील वीज देयके अदा केल्यानंतर, संबंधीत जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने तपासून त्यापैकी ५०% रक्कम, जिल्हा परिषदेला या प्रित्यर्थ मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून समायोजित करावी.

२. वर नमूद केलेली योजना ही दि. १ एप्रिल, १९९६ पासून अंमलात येईल. त्यामुळे दि. १ एप्रिल, १९९६ पासून पुढे होणाऱ्या वीज बिलाच्या एकूण खर्चाच्या ५०% इतकी रक्कम अनुदान म्हणून संबंधित जिल्हा परिषदांना देय राहील. यासाठी एकूण रु.६०.०० लाखाची तरतूद योजनेतर तरतूद नवीन बाबीद्वारे चालू वित्तीय वर्षाच्या अधिकल्पात करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीचे वाटप करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

३. वरील योजनेवरील खर्च हा "मागणी क्रमांक-एल-२, ३६०४, स्थानिक संस्था व पंचायती राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे [एक], देणे २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे [एक]. विद्युत पाणी पुरवठा योजनांसाठी लागणाऱ्या वीज बिलाच्या ५०% पर्यंत अनुदान जिल्हा परिषदा/ग्रामपंचायतींना देणे [३६०४०४६१]" या लेखाशीर्षा-खाली केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.क्र. ९३०/९४/व्यय-३, दिनांक ३१.८.१९९६ नुसार त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ग. गो. पंचभाई]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

.......३/-

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव.

मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

सर्व विभागीय आयुक्त.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ.

मुख्य अभियंता [ग्रामीण], महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई.

संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य पुणे-३७.

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर [लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता]

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.

सर्व उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा.

नियोजन विभाग [२ प्रती]

वित्त विभाग [व्यय-३/अर्थोपाय] महसूल व वन विभाग/समाज कल्याण सांस्कृतिक, क्रिडा विभाग/उद्योग, उर्जा व कामगार विभाग.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

निवड नस्ती.